MHSN030019842022

## म.सं.कौ.हिं.का अर्ज नं.६७/२०२२ मधील नि.क्र.३० वरील आदेश

(अरुंधती शिंदे वि. शारदा शिंदे व इतर)

प्रस्तुत प्रकरणात जाबदार क्र. २ यांनी म्हणणे नाहीचा आदेश रद्द होवुन अर्जात म्हणणे माडण्याची संधी देण्याकरिता दाखल केला आहे. जाबदार क्र. २ चे म्हणणे असे आहे की, त्या लग्नानंतर मौजे कुपवाड येथे सासरी नांदत असल्यामुळे त्यांना अर्जाची माहिती होवु शकली नाही व सन २०२१ व २४ मध्ये बाळंतपण झाल्याने त्यांचा इतर जाबदार यांच्याशी संपर्क होवु शकला नाही. सबब, त्यांना अर्जास हजर राहता आले नाही. म्हणुन त्यांच्याविरुध्द दिनांक २२.११.२०२४ रोजी एकतर्फा आदेश पारित झाला. मात्र अर्जाचा गुणदोषावर निकाल लागण्याकरिता त्यांना म्हणणे देण्याची संधी देण्यात यावी त्यामुळे अर्जदारचे कोणतेही नुकसान होणार नाही.

२. अर्जदार यांनी आक्षेप नोंदविला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे नोटीस अहवालवरुन असे दिसुन येते की, जाबदार क्र. ४ यांनी सदरच्या प्रकरणाची कल्पना जाबदार क्र. १, २ व ३ ला देतो असे नोटीस बजावणीवेळी सांगितले होते व तशी हमी दिली होती. त्यानंतरही जाबदार क्र. २ यांना आर. पी. ए. डी मार्फत (निशाणी २२) नोटीस पाठविली असता नोटीस स्वीकारण्यास नकार दिला असा शेरा होवुन नोटीस परत आली आहे. यावरुन असे दिसुन येते की, प्रकरणाची पुर्ण माहिती असतानाही जाणूनबुजून ते हजर झाले नाहीत. त्यांचा प्रकरण लांबविण्याचा हेतू आहे. सबब, अर्जात नमूद कारण खोटे असून अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. जाबदार क्र. २

यांना नोटीस आर.पी.एडी द्वारे दिल्याचे व त्यांनी घेण्यास नकार दिल्याचे दिसून येते. तरीही अर्जाचा गुणदोषांवर निकाल लागण्याकरिता त्यांचे म्हणणे अभिलेखावर घेणे व त्यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. मात्र ते वेळेत हजर न झाल्यामुळे प्रकरणास जो विलंब होत आहे त्याचा विचार करता शुल्क करणे योग्य राहिल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज रु. ८००/- च्या शुल्कासह मंजुर करण्यात येतो.

२. जाबदार क्र. २ विरुध्द दिनांक २२.११.२०२४ रोजी झालेला म्हणणे नाहीचा आदेश रद्द करुन म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येते.

VEDVATI ANIRUDHA ADYA
Digitally signed by VEDVATI ANIRUDHA ADYA
Date: 2026.01.08 15:24:59 +0530

सांगली. (वेदवती अनिरुध्द आदय)

दिनांक ०८.०१.२०२६ ३ रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगली.